दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ६६ वा ▶ बुधवार दि.१० जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### भरधाव बोलेरोच्या धडकेत युवक ठार

**शिरपूर ।** भरधाव बोलेरोने धडक देऊन झालेल्या अपघातात युवक ठार झाला. हा अपघात २६ डिसेंबरला सायंकाळी सुळे येथे घडला होता. इंदरसिंह धुलसिंह पावरा (वय २८, रा. नटवाडे, ता. शिरपूर) असे मृताचे नाव आहे. तो सुळे गावातील मटण विक्रीच्या दुकानासमोर उभा असताना भरधाव आलेल्या बोलेरो (एमएच १८, बीसी ३०६२)ने त्याला धडक दिली. या अपघातात तो ठार झाला. वाहनचालक रतिलाल बलजी पावरा (रा. चिलारे, ता. शिरपूर) अपघातानंतर पळून गेला. मृत इंदरसिंहचा भाऊ राकेश पावरा याने सांगवी पोलिसांत फिर्याद दिली.

### बेपत्ता पुरुषाचा मृतदेह तापीत आढळला

**धुळे ।** घरातून निघून गेलेल्या पुरुषाचा मृतदेह ७ जानेवारीला सकाळी तापीच्या तरंगताना आढळला. याबाबत शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. अशोक बाबूराव वाघ असे मृताचे नाव असून, तो मांडळ (ता. शिरपूर) शिवारातील व्यंकटेशनगर येथील रहिवासी होता. काही दिवसांपासून मानसिक तणावात होता. ४ जानेवारीला तो राहत्या घरातून निघून गेला होता. परिसरात व नातलगांकडे शोध घेऊनही त्याचा तपास लागू शकला नाही. ६ जानेवारीला त्याचा मुलगा मयूर वाघ याने दिलेल्या माहितीवरून शहर पोलिस ठाण्यात बेपत्ता नोंद करण्यात आली. तापी नदीपात्रात मासेमारी करणाऱ्यांना मृतदेह तरंगताना आढळला. त्यांनी दिलेल्या माहितीवरून, नातलगांनी जाऊन पाहणी केल्यावर मृतदेह अशोक वाघ यांचा असल्याचे निष्पन्न झाले.

# मोदी सरकारची गॅरंटी मतांसाठी पुरेशी चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

### राम मंदिरावरून राजकारण करू नका, काळाराम मंदिरात महाआरती

**नाशिक । अजय भोसले**

पंतप्रधान मोदी सरकारच्या जनकल्याणाच्या विविध योजना व विकासाची गॅरेंटी ही भाजपा कार्यकर्त्यांना मते मागण्यासाठी पुरेशी आहे, असा दावा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. सत्तेचा वापर जनकल्याचे साधन म्हणून व्हावा असेही आवाहन त्यांनी केले.

नाशिक प्रवासात पंचवटी येथील काळाराम मंदिरात प्रभू श्रीरामाची महाआरती केल्यावर ते माध्यमाशी संवाद साधत होते. २२ जानेवारीला होणाऱ्या राम मंदिराच्या उद्घाटनाच्या सोहळ्यावरून जे लोक राजकारण करीत आहे, त्यांना त्यांचे राजकारण लखलाभ असो, असा टोला लगावताना धार्मिक विषयावरून भाजपाला मते मागण्याची गरज नाही. आम्ही रामाचे सेवक म्हणून देशाचे व महाराष्ट्राचे हित जोपासण्याचे काम करीत आहे. समाजातील अखेरच्या व्यक्तिंच्या कल्याणसाठी आम्ही काम करणारे कार्यकर्ते आहोत, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या या प्रवासात केंद्रीय आरोग्य व कुटुब कल्याण राज्यमंत्री डॉ.भारती पवार, राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री गिरीश महाजन, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, स्थानिक आमदार, जिल्हाध्यक्ष, लोकसभा व विधानसभांचे समन्वयक व निवडणूक प्रमुख यांच्यासह सर्व महत्वाचे पदाधिकारी उपस्थित होते. नाशिक प्रवासाची सुरुवात प्रभू श्री रामाच्या दर्शनाने व्हावी हाच उद्देश असल्याने त्यांचा संबंध कोणत्याही इतर बाबीशी जोडता येणार नाही. प्रभू श्री रामाचे दर्शन करून महाराष्ट्रात कोणतेही अमंगल होऊ नये, दुष्काळ पडू नये, सर्वांचे मंगल व्हावे अशी प्रार्थना केली, असे बावनकुळे म्हणाले. यावेळी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्य मंत्री डॉ. भारती पवार, महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, स्थानिक आमदार, पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी आचार्य महामंडलेश्र्वर सुधीरदास महाराज यांनी श्रीरामाची पूजा सांगितली. रामरक्षा स्तोत्र पठण झाले. उपस्थित सर्व भक्तांनी श्रीरामाचा जयघोष केला. अतिशय प्रसन्न वातावरणात महाआरती झाली.



#### लोकसभा वॉरियर्सशी संवाद

**नाशिक प्रवासात बावनकुळे यांनी नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील सुपर वॉरियर्स व प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले, मागील १० वर्षांत मोदींनी देशकल्याण व गरीब कल्याणाच्या ज्या योजना राबविल्या, जनसेवेसाठी जीवन अर्पित केले हेच जनतेकडून मतांचे कर्ज घेण्यासाठी पुरेसे आहे. त्यासाठी सर्वांनी दररोज ३ तास पक्षकार्यासाठी द्यावे, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.**

#### हिमाचल प्रदेशातील नागरिकांची भेट

**काळाराम मंदिरात दर्शनासाठी आलेल्या हिमाचल प्रदेशातील महिला-पुरुषांशी यावेळी भेट झाली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या प्रदेशातून आलेल्या या महिलांनी त्यांच्या कामाची प्रशंसा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातील सरकारमुळे महिलांचे जीवन सुकर झाल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. हिमाचलची लोकगीते त्यांनी यावेळी सर्वांसमोर सादर केलीत. प्रभू श्री रामाच्या मंदिरात झालेला हा संवाद आनंद देणारा ठरला.**

# न्यायाधीशच आरोपीला भेटले, तर काय अपेक्षा करावी : उद्धव ठाकरे

### अपात्रता प्रकरणाचा निकाल काय लागणार हे जनतेला समजले

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिवसेना आमदार अपात्र प्रकरणी विधानसभा अध्यक्ष उद्याही वेळकाढूपणा करतील, असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तर शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी निकाल देण्यापूर्वी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या भेटीवर ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे.

दरम्यान नार्वेकर यांनी दोनदा मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, न्यायमुर्ती २ वेळा आरोपीला भेटले, असे म्हणत त्यांनी शिंदे आणि नार्वेकर यांच्या भेटीवर टीका केली आहे. यामुळे उद्या काय निकाल लागणार हे जनतेला समजले आहे, असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सूचक विधान केले आहे. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, लवाद म्हणून अध्यक्ष महोदय दोन वेळेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घरी जाऊन भेटले आहेत. याचा अर्थ होतो की न्यायाधीश आरोपीला जाऊन भेटले. ते मुख्यमंत्र्यांना तसं भेटले तर हरकत नाही पण खटला सुरू असताना ते भेटले. ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उल्हास बापट यांची मुलाखत तुम्ही ऐकायला हवी ते सांगत आहेत की किती वेळ काढला जात आहे. लोकशाहीचा खून यामुळे होतोय की काय अशी परिस्थिती आहे. त्यात ते उघड उघड भेटत आहेत.आम्ही सर्वोच्च न्यायालयाला विनंती करतो की तुमच्या डोळ्यादेखत हे घडत आहे. देशात लोकशाही आहे की नाही, हे ठरवणारा निर्णय असेल, असे उद्धव ठाकरे म्हणाले. बुधवारी शिवसेना अपात्रतेप्रकरणी निर्णय येणार आहे. त्याबाबत उद्धव ठाकरे यांनी मत व्यक्त केले आहे.



#### सुप्रीम कोर्टाकडून अपेक्षा

**उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, दीड वर्षांपासून ही सुनावणी सुरू आहे. आम्हाला सुप्रीम कोर्टाकडून न्यायाची अपेक्षा आहे. वेडावाकडा निकाल लागला तर जनतेला सर्व माहिती असायला हवे. भरत गोगावले यांची प्रतोद पदाची निवड बेकायदेशीर आहे, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. तर अजय चौधरी यांची गटनेते पदी निवड वैध ठरवण्यात आली आहे.**

## मारहाणीतील जखमीचा मृत्यू; ११ जणांवर खुनाचा गुन्हा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मागील भांडणातून जातोडा (ता. शिंदखेडा) येथे २९ डिसेंबरला दोन गटांत हाणामारी झाली. त्यात लाकडी दांडके व दगडांच्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या एकाचा मृत्यू झाला.

मिय्यालाल नसीर पटेल असे त्यांचे नाव आहे. या प्रकरणी नरडाणा पोलिस ठाण्यात वाढीव कलमान्वये ११ संशयितांवर खुनाचा गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी चार संशयितांना ताब्यात घेतले. बानोबी मिय्यालाल पटेल (रा. जातोडा) यांच्या फिर्यादीनुसार मागील भांडणाच्या वादातून फारूक निंबा पटेल याने पती मिय्यालाल पटेल यांना लाकडाने मारहाण केली. त्यात ते पडल्यानंतर बाजूला पडलेला दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले. तसेच बानोबी पटेल यांचा मुलगा अरमान पटेल, जुबेर पटेल, पुतण्या फिरोज पटेल यांनादेखील फारूक पटेल याच्यासह आसिफ निंबा पटेल, वसीम सलीम पटेल, दानिश शकील पटेल, शकील निंबा पटेल, अत्ताफ गनी पटेल, सलीम निंबा पटेल, भिक्या हबीब पटेल, साबीर हबीब पटेल, नदीम सलीम पटेल, सलीम हुसेन पटेल (सर्व रा. जातोडा) यांनी लाकडी दांडक्याने मारहाण करीत जखमी केले. बानोबी पटेल यांची सून रुबिना भांडण सोडविण्यासाठी गेली असता तिच्या गळ्यातील सोन्याची पोत तुटून गहाळ झाली. भांडण सोडविल्यानंतरही शिवीगाळ करीत ठार करण्याची धमकी दिली. या प्रकरणी ११ संशयितांवर गुन्हा नोंद झाला होता.




## पंधरा मोबाईलसह चोरटा ताब्यात

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



धुळे शहरात सध्या मोबाईल चोरीचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट सुरू आहे. याच दरम्यान चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एका सराईत मोबाईल चोरट्याला पोलिसांनी १५ मोबाईलसह ताब्यात घेतले आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने धुळे शहरामध्ये मोठ्या प्रमाणात मोबाईल चोरीचे प्रकार घडत असल्याने त्यांना आळा घालण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांसह सर्वच पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना दिले होते.

दि.२५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास मोहम्मद कमरोद्दीन मोहम्मद अजीजउल्ला कुरेशी, रा.मिसबा मशिद जवळ, अंबिका नगर, धुळे यांचे रहाते घरातून चोरट्याने १३ हजार रूपये किंमतीचा मोबाईल लंपास केला. धुळे एलसीबीचे निरिक्षक दत्तात्रय शिंदे यांनी विशेष मोहिम राबवून कबीर युसुफ काझी, रा.चाळीसगावरोड, गजानन कॉलनी, धुळे यास ताब्यात घेतले. अधिक चौकशीत त्याने १५ महागडे मोबाईल काढून दिले. या मोबाईलची एकूण किंमत १ लाख ८८ हजार रूपये एवढी आहे. सदरची कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली धुळे स्थानिक गुन्हे शाखेचे निरिक्षक दत्तात्रय शिंदे, पोसई प्रकाश पाटील, असई शाम निकम, पोहेकॉ सुरेश भालेराव, पोहेकॉ पंकज खैरमोडे, पोना रविकिरण राठोड, पोकॉ गुणवंत पाटील, पोकॉ सुशिल शेंडे, पोकॉ निलेश पोतदार, पोकॉ अमोल जाधव या पथकाने केली.

## दारूसाठी कापला बायकोचा कान

**शिरपूर ।** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने पत्नीच्या कानातील दागिना काढून घेण्यासाठी नवऱ्याने तिचा कानच कापून काढला. ही घटना भाटपुरा (ता. शिरपूर) येथे घडली. जखमी महिलेवर उपचार सुरू असून, तिने दिलेल्या फिर्यादीवरून संशयित पतीविरोधात थाळनेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जागृती घनश्याम राठोड असे जखमी महिलेचे नाव आहे. पती घनश्याम काळू राठोड (वय ३५) घरी आला. 'मला दारू पिण्यासाठी पैसे दे' अशी त्याने मागणी केली. तिने माझ्याकडे पैसे नाहीत, मी कुठून देऊ, असे उत्तर दिले. त्यावर संशयिताने तिला कानातला दागिना काढून देण्यास सांगितले. तिने नकार दिल्यामुळे घनश्याम राठोडने हातात चाकू घेऊन तिचा डावा कान कापून काढला. कानातून रक्तस्राव झाल्याने ती गंभीर जखमी झाली. तिचा आरडाओरडा ऐकल्याने शेजारी धावत आले. त्यांनी जागृतीला रुग्णालयात दाखल केले.

## आई यल्लमा देवीचा यात्रोत्सव भक्तिभावाने उत्साहात संपन्न, शहरात निघाली भव्य शोभायात्रा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे शहरातील मालेगाव रोडवरील श्री आई रेणुकादेवी यल्लमा यात्रोत्सवाला सोमवार दिनांक ८ जानेवारी रोजी सुरवात झाली. यात महाआरती व रक्तदानासह विविध पूजाविधी करण्यात आले. यात्रेत बालगोपाल आबालवृद्धांसह, महिलासह भाविकांनी दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी गर्दी केली होती. मंगळवार दिनांक ९ जानेवारी रोजी या श्री आई रेणुकादेवी यल्लमा यात्रोत्सवाच्या समारोपानिमित्त धुळे शहरातून श्री आई रेणुकादेवी यल्लमा देवीच्या पालखीसह भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेत आकर्षकरित्या सजविलेल्या पालखीत देवीची मूर्ती दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. श्री महामंडलेश्वर पार्वती रवी पुजारी एका ओपन जीपमध्ये बसून येणारी भाविकांच्या मस्तकी देवीचा भंडारा लावून आशीर्वाद देत होते. तसेच ढोल ताशांच्या वाड्यावर तरुण व पुरुष मंडळी नृत्याचा मनमुराद आनंद घेत शोभायात्रेत सहभागी झाले होते. मालेगाव रोडवरील देवीच्या मंदिरापासून सुरु झालेल्या या शोभायात्रेला आग्रा रोडवर देवीच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती. ट्रस्टचे अध्यक्ष बबन जिरेकर, यांच्यासह यल्लमा देवीचे सेवेकरी, भाविक एकनाथ विजय व्यायाम शाळेचे अध्यक्ष पैलवान संजय शेंडे, अशोक कोरे, जीवन शेंडगे, मयुर खोपडे, मयुर कंर्डे, अशोक मंगीडकर, सुनिल जिरेकर, बंटी शेवतकर, सागर चौगुले,अविनाश लोकरे, बाळू मंगीळकर याच्यांसह यलमार समाज या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बांधव होते. शोभायात्रेचे आयोजन श्री आई यल्लमा रेणुका देवी मंदिर ट्रस्ट व समस्त यलमार समाजातर्फे करण्यात आले होते.



## आदिवासींचा शबरी घरकुलांसाठी इगतपुरीत मोर्चा

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

इगतपुरी तालुक्यातील आदिवासी, भूमिहीन, विधवा, अपंगांना शबरी योजनेतून घरकुल मिळावे, यासाठी मंगळवारी इगतपुरी पंचायत समिती कार्यालयावर एल्गार संघटनेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला.

इगतपुरी तालुक्यातील आदिवासी, भूमिहीन, विधवा, अपंग यांनी घरकुलासाठी प्रशासनाकडे अर्ज केले आहेत. घरकुल योजनेचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी आदिवासी विकास विभागाकडे पाठवणे आवश्यक होते. मात्र हे अर्ज अद्यापही पंचायत समितीने पुढील कार्यवाहीसाठी दिलेले नाहीत. याबाबत अनेकदा पाठपुरावा करूनही पंचायत समिती कार्यालयाकडून कोणतेच प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.परिपूर्ण घरकुल प्रस्ताव तत्काळ आदिवासी विकास विभागाकडे पाठविण्यासंदर्भात पत्रदेखील त्यांच्याकडून देण्यात आले. मात्र तरीदेखील शबरी घरकुल योजनेचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले नाहीत. इगतपुरी तालुक्यातील शेकडो पात्र आदिवासी कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.

## ऑल इंडिया ट्रान्सपोर्टशी चर्चेनंतर भारतीय न्याय संहिता लागू होणार

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय दंड संहिता २०२३ बाबत गैरसमज पसरून काही चालकांकडून काम बंदची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्था ठप्प होत आहे. वास्तविक ऑल इंडिया ट्रान्सपोर्टशी चर्चेनंतर भारतीय न्याय संहिता २०२३ लागू करण्यात येणार याबाबत शासनाने आश्र्वासन दिले आहे. त्यामुळे चालकांमध्ये हा कायदा लागू करण्याबाबतचा गैरसमज अथवा अफवा पसरवू नये असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र फड यांनी केले आहे.

भारतीय न्याय सहिंता २०२३ लागू करण्याबाबत ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट संघटनेने संप पुकारल्या नंतर शासनाच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर ऑल इंडिया ट्रान्सपोर्टशी चर्चेनंतर भारतीय न्याय संहिता २०२३ लागू करण्यात येईल असे आश्र्वासन दिले आहे. वाहतूक व्यवस्था ठप्प होत आहे. त्यामुळे कुणीही चालकांमध्ये चुकीचा गैरसमज पसरवू नये असे आवाहन राजेंद्र फड यांनी संघटनेच्या वतीने केले आहे.

## तलाठी भरती रद्द नको : पारदर्शक निकाल जाहीर करा

### चूक यंत्रणेची, शिक्षा विद्यार्थ्यांना का?

तलाठी परीक्षेची निवड यादी प्रसिद्ध करताना नॉर्मलायझेशन प्रक्रियेनंतरचे उमेदवारांना मिळालेले गुण जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये नॉर्मलायझेशननंतर ६ गुणांपासून ते तब्बल ३० गुण, तर काही उमेदवारांना तर त्यापेक्षाही अधिक गुण वाढवून दिल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचबरोबर दुसरीकडे काही उमेदवारांचे नॉर्मलायझेशनमुळे ५० हून अधिक गुण कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे एकाला न्याय, तर दुसऱ्यावर अन्याय, असा काहीसा प्रकार या भरतीतून समोर आला आहे. त्याविरोधात संतप्त विद्यार्थ्यांकडून राज्यभरातून आवाज उठवला जात आहे. परिणामी ही प्रक्रियाच रद्द होण्याची शक्यता आहे, तसे झाल्यास प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ शकतो. या भरतीच्या परीक्षेची निवड यादी जाहीर झाल्यानंतर एक धक्कादायक गोष्ट समोर आली. एखादा परीक्षार्थी दुसऱ्या परीक्षेत नापास होतो. परंतु तलाठी भरती परीक्षेत टॉपर होतो. तसेच काही परीक्षार्थींना २०० गुणांच्या परीक्षेत २१४ गुण मिळाले आहेत, असे प्रकार घडताना आपण वारंवार पाहतोय. परीक्षांमध्ये पेपरफुटी, गुणांची अदलाबदल करणे, याबद्दल कठोर कायदा आणला पाहिजे. घोटाळा समोर आल्याने आता ही परीक्षा रद्द होणार का? अशी भीतीदेखील अनेक विद्यार्थ्यांच्या मनात आहे. कोणत्याही परीक्षेमध्ये एकूण गुणांपैकी मिळालेले गुण हे पैकीच्या पैकी किंवा त्यापेक्षा कमी असायला हवेत. मात्र तलाठी परीक्षेमध्ये पहिल्यांदाच असे घडले आहे की, एकूण गुणांपेक्षा काही परीक्षार्थीना मिळालेले गुण हे जास्त आहेत. त्यामुळेच या प्रक्रियेवरच शंका उपस्थित केली जात असून सर्वच निकालाची चौकशी करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.




#### नव्याने निकाल जाहीर करा....

**परीक्षा रद्द करून प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिक गुंतागुंतीचा होणार आहे. त्यातच निवडणुका समोर असल्याने भरती प्रक्रिया पुढे ढकलली जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शिवाय ज्या विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून चांगले गुण मिळवले असतील त्या विद्यार्थ्यांवरही अन्याय होणार आहे. त्यामुळे परीक्षा रद्द करण्याऐवजी विद्यार्थ्यांना मिळालेल्या मूळ गुणांवर निकाल जाहीर करावा किंवा नॉर्मलायझेशनची प्रक्रिया नव्याने राबवण्यात यावी आणि मूळ गुण, वाढीव गुण अशी सविस्तर माहितीसह यादी जाहीर करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून जोर धरू लागली आहे.**

#### त्यांना खड्यासारखे बाजूला करा...

**घोटाळा बाहेर आला म्हणून परीक्षा रद्द करणे हाच एकमेव पर्याय असू शकत नाही. त्यामुळे काही भ्रष्ट विद्यार्थ्यांमुळे सर्वच प्रामाणिक विद्यार्थ्यांचेही नुकसान होणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषींची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करून त्यांची यादीतून नावे बाद करावीत आणि सर्वच लिस्ट जाहीर करावी. या लिस्टमध्ये मूळ गुण आणि नंतरचे गुण याचा स्पष्ट उल्लेख असावा, जेणेकरून कोणाचे किती गुण वाढलेत याची माहिती मिळेल. संशयित उमेदवाराने ज्या केंद्रावर परीक्षा दिली आहे, त्या केंद्राचे सीसीटीव्ही तपासले तर सत्य बाहेर पडेल.**

## आमदार निवासस्थानाजवळून पीकअप वाहन लंपास

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील आमदार निवासस्थानाजवळून चोरट्याने पीकअप वाहन लंपास केल्याची घटना घडल्याने जनता भयभीत झाली आहे. यातून चोरट्यांची वाढलेली हिम्मत दिसून येते. शिवाय चोरटे पोलिसांना खुले आव्हान देत आहेत.

सुलतान शाह हुसेन शाह हे व्यवसायाने ड्रायव्हर असून रमजानबाबा नगरातील घर नं.४ येथे त्यांचे वास्तव्य आहे. दि.६ जानेवारी रोजी रात्री नेहमीप्रमाणे ते त्यांचे पीकअप वाहन क्र.एम. एच.१८/ए.सी.९९०९ ऐंशी फुटी रोडवरील आमदार निवासस्थानाच्या शंभर ते दिडशे फूट अंतरावर लावून परिवारासह झोपले. मध्यरात्री नंतर २ ते ३ वाजे दरम्यान चोरट्याने सदर वाहन चोरून नेले. या ठिकाणी असलेल्या हाजी चिकन सेंटरवरील सीसीटिव्ही कॅमेर्यात चोरट्याची ही करतूद कैद झाली आहे. दरम्यान, सकाळी उठल्यानंतरसुलतान शाह यांच्या वाहन चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ आझादनगर पोलिसांशी संपर्क साधून घडला वृत्तांत कथन केला. याप्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## चिंतनाशिवाय सोहळा

नाट्य संमेलनात घोषणांचा पाऊस होता. लोककलावंतांची हलाखीची स्थिती, जुन्या नाट्यगृहांचे प्रश्न यात शासनाची मदत गरजेची असली तरी सर्व काही शासनाने करावे, ही भूमिका सोडली तरच नाट्यसृष्टी खंबीरपणे पुढे जाईल.

शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात रंगभूमीसंदर्भातील चिंतनाचा अभाव जाणवला. सोहळा दिमाखदार झाला, मात्र तो मराठी रंगभूमीला समृद्धी देणारा ठरला का? याचे उत्तर तपासून पाहावे लागेल. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांची संमेलनाला उपस्थिती होती. अर्थात, संमेलनामध्ये नाटकांच्या प्रयोगांबरोबरच राजकीय अंक रंगणे स्वाभाविक होते. किंबहुना संपूर्ण संमेलनाचा प्रकाशझोत राजकीय मंडळींच्या विधानांवरच राहिला. शताब्दीचे गांभीर्य आपण राखत आहोत किंवा नाही, याचा विचार होणे आवश्यक आहे. नाट्य संमेलनाची शताब्दी राज्यभर साजरी होणार आहे, मुख्य संमेलनाचा भाग म्हणून ठिकठिकाणी संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. तेथे विचार मंथन होणारच आहे, असे समर्थन करून चालणार नाही. 'आगामी काळात मराठी रंगभूमी भारतीय रंगभूमीचे प्रतिनिधित्व करेल', असा आशावाद मावळते संमेलनाध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांनी व्यक्त केला. तो प्रत्यक्षात यावा असे वाटत असेल तर मराठी रंगभूमीला आज भेडसावणार्या समस्यांना थेट भिडण्याशिवाय पर्याय नाही. विष्णुदास भावे यांना आधुनिक मराठी रंगभूमीचे जनक मानले जाते. १८४३ मध्ये त्यांनी 'सीतास्वयंवर'चा प्रयोग करून नाट्यसंस्कृतीचा पाया रचला. संगीत नाटकांच्या रुपाने मराठी रंगभूमीने वैभवाचे शिखर पाहिले. बालगंधर्व, मास्टर दीनानाथ यांसह अनेक दिग्गजांनी मराठी मनावर अधिराज्य गाजविले. खाडिलकर, गडकरी, वि.वा. शिरवाडकर, प्र.के. अत्रे, पु.ल. देशपांडे, वसंत कानेटकर आणि अन्य प्रतिभावान लेखकांनी आपले अक्षर साहित्य रंगभूमीला अर्पण केले. हा देदीप्यमान वारसा आपल्याला पुढे न्यायचा आहे, याचे विस्मरण नाट्यक्षेत्राला होता कामा नये.

अंतर्गत वाद संपवा

आज नाट्य संस्थांमध्ये आलबेल नाही. त्यांच्यातील अंतर्गत वाद वेळोवेळी चव्हाट्यावर येतात. शंभरावे संमेलन अतिविलंबाने होण्यास तेही कारण आहे. नाट्यसृष्टी बहरायची असेल तर गटातटाचे राजकारण बाजूला ठेवावे लागेल, असा सल्ला मंत्री आणि नाट्य संमेलनाचे निमंत्रक उदय सामंत यांनी भर संमेलनात दिला, यातच सारे आले! साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिकास सन्मानाने देण्याची प्रथा सुरु झाली आहे. मराठी साहित्य संमेलनाहून नाट्य संमेलनाची परंपरा अधिक जुनी आहे. मग तेथे ज्येष्ठ कलाकारांना सन्मानाने अध्यक्षपद दिले जावे, ही अपेक्षा वावगी नाही. प्रत्येक विद्यापीठात नाट्य विभाग आहे. आता या विभागासाठीचा निधी विद्यापीठांकडून आपापल्या पातळीवर उपलब्ध करून दिला जातो. सरकारने या विभागांसाठी अनुदान द्यावे, अशी सूचना संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल यांनी केली. नाट्य शास्त्र विभागांचे महत्त्व असले तरी या विभागातून शिकलेल्यांपेक्षा इतरांचेच नाट्यसृष्टीसाठी अधिक योगदान असल्याचे दिसून येईल. असे विभाग सांभाळणार्यांनी आपले राजकीय विचार दूर ठेवून केवळ रंगभूमीसंदर्भातील शास्त्रात विद्यार्थी कसे पारंगत होतील, हे पाहावे लागते. ती प्रगल्भता अनेकांकडे नाही, ही वस्तुस्थिती. नाट्यगृहांच्या व्यवस्थापनाचे काम ज्येष्ठ कलाकारांकडे सुपूर्द करावे, अशी सूचना पुढे आली आहे. बहुतेक ठिकाणी शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नाट्यगृहांचे व्यवस्थापन आहे. काही ठिकाणी नाट्य प्रयोगांसाठी तारखांचा काळाबाजार होतो, हे उघड गुपित. नाट्यसृष्टीतील किती जण त्या विरोधात आवाज उठविण्याचे धैर्य दाखवितात? नाट्य शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या प्रयोगांना सेन्सॉरशिप नको, ही अपेक्षा गैर नाही. मात्र, अशी सेन्सॉरशिप एखाद्या संघटित गट वा समूहाकडून कोणत्या ना कोणत्या मार्गाने येते तेव्हा या क्षेत्रातील ज्येष्ठ मौन बाळगतात, त्याचे काय? प्रयोग संख्या वाढविण्यासाठी अर्धवट तालमी करून नाटक सादर करण्याच्या प्रवृत्तीवर पटेल यांनी बोट ठेवले हे योग्य झाले. नव्या दमाचे नाटककार येत आहेत, त्यांच्या नाटकांचे प्रयोग गाजत आहेत. मात्र जुन्या पिढ्यांमधील नाटककारांच्याच नाटकांना चिरंतनत्व का? याचा अंतर्मुख होऊन विचार आवश्यक आहे.

## मालदीवला मोदींनी शिकवला धडा



भारत आणि मालदीव यांच्यात इतके दिवस सौहार्दाचे वातावरण होते, आता ते दूषित झाले आहे. मालदीवच्या तीन मंत्र्यांवर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अपमानजनक टिप्पणी केली म्हणून कारवाई करण्यात आली आहे. मालदीवला भारताचे सिनेस्टार वर्षानुवर्षे सुट्ट्यांच्या दिवसांत जात असत. पण आता मोदी यांच्याविरोधात अभद्र टिप्पणी केल्याबद्दल या मंत्र्यांना मालदीव सरकारने मत्रिमंडळातून बडतर्फ केले आहे. वास्तविक पंतप्रधान मोदी हे लक्षद्वीपला गेले होते. तेथे त्यांची स्नॉर्कलिंग करतानाची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आणि त्यावर तीन मंत्र्यांनी अभद्र टिप्पणी केली. मोदी यांना विदूषक म्हटले. आता इतकी गलिच्छ भाषा पंतप्रधानांबद्दल वापरल्यावर समाजमाध्यमांत याचा संताप उमटणे साहजिकच आहे. त्यानुसार अनेक सोशल मीडियावर मालदीवच्या मंत्र्यांविरोधात आणि सरकारविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. पण भारत हा मालदीवचा पर्यटनाचा मुख्य स्त्रोत आहे. कित्येक भारताच्या लोकांनी मालदीवला आपल्या आरक्षित केलेल्या सुट्ट्या रद्द केल्या. मालदीवच्या पर्यटनाचे प्रचंड नुकसान झाले आहे. याचे भान आल्यावर मालदीव सरकारने त्या तीन मंत्र्यांना बडतर्फ केले आहे. वास्तविक पंतप्रधान मोदी यांच्यावर टिप्पणी करण्याची काहीही गरज नव्हती, पण काही लोकांना खाज सुटलेली असते आणि ती त्यांना स्वस्थ बसू देत नाही. तसेच आता घडले आहे. पण या वादाचा परिणाम मालदीवसारखे राष्ट्र भोगणार आहे.

पंतप्रधान मोदी यांच्याविरोधात ज्या टिप्पणी करण्यात आल्या आहेत, त्यांना समर्थन देणारे पाकिस्तानी जास्तीत जास्त आहेत. पाकिस्तानची जी अवस्था आहे ती पाहता पाकिस्तानी लोकांची आता मालदीवच काय, पण इस्लामाबादलाही जाण्याची क्षमता नाही. भुखेकंगाल झालेले राष्ट्र आहे आणि त्यांनी कितीही मोदी विरोधातील टिप्पणीला समर्थन केले, तरीही नुकसान शेवटी मालदीवचे आहे. मालदीव येथील मोदी यांच्याविरोधाचे जनक नेहमीप्रमाणे भारतातील विरोधक आहेत. त्यांनी असल्या फडतूस आंदोलनाला समर्थन दिले आहे. मोदी यांना निवडणुकीतून दूर करू शकत नाही, म्हणून जास्तीत जास्त क्षुद्र डावपेच वापरण्यावर आता विरोधक उतरले आहेत. लक्षद्वीपमधून वारंवार निवडून येणारे खासदार होते हमीद अन्सारी. त्यांनी भारताचे उपराष्ट्रपतीपद भूषविले. त्यांना काँग्रेसच्या राजकारणात हे पद मिळाले होते. त्यातून काँग्रेसला आपली अल्पसंख्याकांची व्होट बँकही सांभाळता आली, पण याच हमीद अन्सारी यांनी राज्यसभेच्या सभापतीपदावरून निवृत्त होताना भारताविरोधात गरळ ओकले होते. त्यांना भारताचे तत्कालीन काँग्रेस सरकार डोक्यावर घेऊन नाचत होते. आता लक्षद्वीपचे पर्यटन वाढविण्यासाठी भारतातील विरोधकांचा पाठिंबा असल्याने मालदीवच्या पर्यटनात मिठाचा खडा टाकण्याचे कारस्थान या प्रकरणामागे आहे.

भारतातील पर्यटनावर अख्खा मालदीवसारखा देश चालतो. त्या देशाच्या पर्यटनाला जोरदार झटका बसला आहे आणि त्यामुळे मालदीवच्या तीन मंत्र्यांना पदावरून जावे लागले आहे. हे उचित झाले आहे. भारताविरोधात गरळ ओकणाऱ्या सापांना दूध पाजणे भारताने बंद केले आहे, याचे प्रत्यंतर आले आहे. लक्षद्वीप हे मालदीवमध्ये आहे आणि मालदीवचा समुद्रकिनारा हा पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. पण येथे आता पर्यटनक्षेत्र रसातळाला गेल्यात जमा आहे. पाकिस्तानच्या समर्थकांनी आपला काहीही संबंध नसताना मालदीवच्या तीन मंत्र्यांचे समर्थन केले, पण त्यामुळे याचा मालदीवला जसा फटका बसला, तसे मालदीवला लवकरच भान आले आणि आता त्या तीन मंत्र्यांना घरी बसविले आहे. पाकिस्तानची अवस्था भुखेकंगाल झाली असताना ते मालदीवमध्ये जाऊन काय पर्यटन वाढविणार हा साधा प्रश्न मालदीव सरकार लक्षात घेत नसेल, तर मग त्या सरकारचे अकलेचे दिवाळे वाजले आहे, हे समजण्यासारखे आहे. लक्षद्वीप असो की मालदीव, हा बहुतेक भाग अल्पसंख्याकबहुल आहे, पण त्यांना आपल्याकडे ओढण्यासाठी काँग्रेसचे तत्कालीन सरकार जीव टाकत असे.

महाराष्ट्रातील एक वयोवृद्ध नेतेही आपली अल्पसंख्याकांची व्होट बँक जपण्यासाठी प्रयत्न करीत असत. आता त्यांचा पक्षच फुटल्यामुळे त्यांचा ही नाईलाज आहे. ज्या मंत्र्यांना बडतर्फ करण्यात आले आहे, त्यांत तिघेही अल्पसंख्याक आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न असला, तरीही अभिव्यक्तीचा वापर लोकशाही पद्धतीने व्हायला हवा, असे मालदीव सरकारने त्या मंत्र्यांना सुनावले आहे. हे प्रकरण मालदीवला खूप जड जाणार आहे, कारण मालदीवची पर्यटन व्यवस्था यामुळे कोसळून पडणार आहे. त्या चिमुकल्या देशाला इतके नुकसान सोसणार नाही, पण मालदीव असो की लक्षद्वीप, भारत द्वेष्ट्यांना सारासार विवेक राहत नाही, त्यामुळे देशाचे नुकसान अटळ आहे. वास्तविक मालदीवचे पंतप्रधान निवडून आले की, प्रथम भारताला भेट देत असतात. इतके संबंध निकटचे आहेत. पण लक्षद्वीपचे पर्यटन वाढू नये, म्हणून कोणता देश या मंत्र्यांच्या ट्वीट कारस्थानामागे आहे, याचा शोध घ्यावा लागेल.

कदाचित हे चीनचे कारस्थान असू शकते. कारण त्याला पडद्याआड राहून खलनायकी कारस्थाने करण्याची सवय लागली आहे. चीन आणि पाकिस्तान या षडयंत्रामागे असू शकतात, पण पाकिस्तानला स्वतःच्या जगण्याची भ्रांत पडली आहे, तरीही भारताचे जिथे नुकसान करणे शक्य आहे, तेथे तो करीत असतो. पण पाकिस्तानला धडा शिकवणे भारताला काहीच अवघड नाही. त्यामुळे भारतातील मिनी पाकिस्तानांनी उठाव केला तरीही भारताने आता पाकिस्तानला आणि भारताविरोधात कारस्थाने करणाऱ्या छुप्या लोकांविरोधात कठोर कारवाई करण्याची वेळ आली आहे. लक्षद्वीपचे पर्यटन वाढले किंवा न वाढेना, पण मालदीवला भारताने चांगली तंबी दिली आहे आणि त्यामुळे इंडिया आघाडीमधील मालदीवचे समर्थक आणि पाकिस्तानातील समर्थक आपली वळवळ थांबवतील, ही आशा आहे.

## अनैतिक संबंध आणि त्याचे सार्वजनिक प्रदर्शन!

परंतु आजकाल हा केविलवाणा प्रयत्न पण कोणी करताना दिसत नाही. जे आहे ते खुलेआम करणे, कोणाला न घाबरता करणे, कोणाची दखल न घेणे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. कोणाची पर्वा आणि कोणाशीच काही घेणं - देणं नसल्यासारखं सर्व मर्यादा धुडकावून स्त्री - पुरुषांमधील अनैतिक संबंधांनी समाजात धुडगूस घातल्याचे दिसते.

प्रामुख्याने पाहिले तर विवाह झालेली, बऱ्यापैकी वय असलेली, मुलं मोठी असलेली, बरोबरीला मुल - मुली आलेली असणारे महिला - पुरुष जास्तच आत्मविश्वास आणि बेफिकीरपणा अंगी बाळगून स्वतःच्या विवाहबाह्य रिलेशनशिप, प्रेमप्रकरण यांचे उदात्तीकरण करताना दिसतात. विवाहित तसेच एकल महिलांनी सुद्धा खरं तर आपले चारित्र्य, आपली सार्वजनिक प्रतिमा जास्त काळजीपूर्वक सांभाळणे आवश्यक असते; परंतु स्वतःवर असलेल्या फाजिल आत्मविश्वासातून त्या जास्त भरकटलेल्या दिसतात. समाजात, सार्वजनिक ठिकाणी वावरताना, आपली देहबोली, हावभाव, वागणं - बोलण, सवयी सगळे पाहत असतात. अशा वेळी अशा पद्धतीने राहणाऱ्या जोड्या त्यांचे चुकीचे संबंध आणि त्यातून घडणारी चुकीची कृत्य मात्र उफाळून बाहेर पडत असतात.

आधीच नातं खोटं, तात्पुरतं, फायद्यापुरतं आणि तकलादू असत. दोघेही काही ना काही सुप्त हेतू मनात ठेवून, गरज आहे म्हणून, गंमत म्हणून अथवा पर्याय म्हणून एकत्र आलेले असतात. अशी नाती बाहेरून जितकी बहरलेली दिसतात तितकीच ती आतून कसमकुवत असतात, पोकळ असतात. म्हणूनच आपलं सगळं कस उत्तम सुरू आहे, आम्हाला आमच्या करणीचा कसलाच गम-पस्तावा नाही हे त्यांना समाजात दाखवावे लागते. चारचौघात वावरताना एकमेकांचा हात धरणे, फ्लर्ट करणे, एकमेकांना धक्के मारत चालणे, नजरेने विचित्र इशारे करणे, हातवारे करणे, एकमेकांना वाटेल ते वाटेल तसे बोलणे, अतिलाडाने वागणे, सतत एकमेकांना खेटून राहणे, एकमेकांना जास्तीत जास्त महत्त्व देणे, मोठमोठ्याने हसणे आणि इतरांना आपल्याकडे आकर्षित करून आपले एकमेकांत किती प्रेम आहे हे दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न करणे, इतरांना आपल्या जवळ आणून आपण पण कसे नॉर्मल आयुष्य जगत आहोत हे दर्शविण्यासाठी कसरत करणे, तसे वायफळ प्रयत्न करणे इतक्या खालच्या पातळीवर अनेक रिलेशनशिपमधील जोड्या गेलेल्या दिसतात.


हे सगळे करताना त्या स्त्री पुरुषाला आपण किती बिनधास्तपणे आपलं प्रेम, जवळीक, सहवास याची अनुभूती घेतोय असे वाटतं असले तरी लोकांच्या दृष्टीकोनातून हा थिल्लरपणा, बाहेरख्यालीपणा आणि व्याभिचार असतो. असे विचित्र वागणारे, सर्वसामान्य विवाहित जोडप्यानं पण लाज वाटावी, इतरांना मान खाली घालायला लागावी असे अनैतिक नात्याचं प्रदर्शन करणे यामुळे आजूबाजूच्या लोकांच्या मनातून असे स्त्री - पुरुष उतरतात. त्यांना तोंडावर जरी कोणी काही बोलत नसले, तरी विशेष करून आपल्या अनैतिक संबंधांचा बाजार मांडणाऱ्या महिलांकडे पाहण्याचा इतर पुरुषांचा दृष्टिकोन वेगळा होतो, तिच्याबद्दल अत्यंत खालच्या दर्जाच्या प्रतिक्रिया दिल्या जातात. तिला समाज चुकीच्या नजरेने पाहतो, तिच्याबद्दल चुकीचे बोलले जातं, तिची बदनामी केली जाते.

समाजाचे, चाकोरीचे नियम तोडून स्वतःच्या रेलशनशिपचे बाजरीकरण करताना पुरुषांना इतका फरक पडत नाही. पुरुषाने एखादी बाई पटवली, फिरवली अथवा ठेवली, लफडं केल तर काय एवढ विशेष?, असे म्हणून लोक त्याकडे दुर्लक्ष करतात; पण जी स्त्री अशा नात्यात गुंतून स्वतःला जाहीरपणे बदनाम करून घेते तिला, तिच्या मुलांना भविष्यात खूप अपमानाला, मानहानीला तोंड द्यावं लागत. समाजात अशा मुक्तपणे उघड उघड रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या, बेकायदेशीर आणि अनैतिक संबंधला, अफेअरला खरं आयुष्य समजून बसणाऱ्या, स्वतःच्या प्रतिष्ठा पणाला लावलेल्या, स्वतःच्या मान - सन्मानाला किंमत न देणाऱ्या, स्वतःहून परक्या पुरुषासोबत मिरवणाऱ्या महिलाबद्दल चुकीची शेरेबाजी सुरू होते, अशा स्त्रीला तोंडावर जरी कोणी काही बोललं नाही, तिची चूक तिच्या लक्षात आणून दिली जात नाही अशा महिलांकडे, जोड्यांकडे लोक विरंगुळा म्हणून बघतात, त्यांची मजा बघतात, पण कोणीच त्यांच्या भानगडीत पडायला जात नाहीत. अशा स्त्रीला वेळीच कोणी समजावून सांगितले नाही, अडविले नाही, तिच्या बेलगाम वागणुकीला कोणीच थांबविले नाही, चांगला सल्ला दिला नाही, तर ती या फसव्या मायाजाळात अधिकाधिक गुंतत जाते आणि स्वतःच आयुष्य तसेच भविष्य खराब करून घेते. अनेकदा पुरुष सुद्धा अशा प्रकरणात प्रमाणापेक्षा जास्त गुरफटून स्वतःच्या संसाराची हानी करून घेतात. अशा पद्धतीने वावरणाऱ्या, वागणाऱ्या जोड्यांना कोणी आळा घालायचा प्रयत्न केला तरी ते एकूण अमलात आणण्याची त्यांची मानसिकता नसते. जोपर्यंत अशा खोट्या आणि दिखाऊ प्रेमाची धुंदी त्यांच्या डोक्यात असते, तोपर्यंत टिकाऊ प्रेम आणि नातेसंबंध कसे आणि काय असतात हेच त्यांना उमगलेले नसते.

**समाप्त:**

**काऊन्सलिंग: मीनाक्षी जगदाळे**

## शब्दकोडे-२८९



**आडवे शब्द**

१. कृष्णाचा मित्र ६. जवळपास, सभोवती ९. ढीग ११. प्रत्येक वर्षी १३. रस्ता १४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर १६. दृष्टिभेट १९. पूर्ण भरतीची वेळ २०. नवा २२. पृथ्वी २३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे २६. प्रत्येक दिवशी, मजुरी २७. जास्त २९. लता, वेल ३०. टिंगल ३१. बोटाच्या टोकावर असते ते ३२. खरेदी ३४. जुने, ऐतिहासिक लेखन ३६. वटवट ३८. जबरदस्तीने (हिंदी) ४०. चेहऱ्याची निमुळती बाजू ४२. ज्वारीची रोटी ४४. माल ४५. हिंदीत कालवा ४६. भाकरी-पोळीचा पाव भाग ४८. अपऱ्या नाकाची ५०. बांबू ५२. आंब्याची पोळी ५४. मांडणी ५६. हिशोबात केलेला गोंधळ ५७. चक्र ५८. रामाचा एक भाऊ ५९. वजनदार ६०. व्यापारी ६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव ६२. अनुकंपा, करूणा ६३. स्तुतीस्तोत्र ६५. भांडण ६७. मागचे अंगण ६९. प्रत्यक्षात ७१. आशीर्वाद, वर ७३. परंपरागत गण वा संपत्ती ७४. शेत ७५. कावळा ७६. जनन ७७. बळी जाणारा ७८. काळ्या पाठीचे हरीण ७९. उत्तराधिकारी ८०. ताक कांुफ्कून पिणारा ८१. मल्याळी भाषिक राज्य

**उभे शब्द**

१. श्रीकृष्णाचे आयुध २. दरवाजा ३. मत्स्य ४. आटोपते घेणे, आवरणे ५. जोरजबरदस्ती ६. कुंभाराची भट्टी, स्त्री ७. काचेचे पात्र ८. मध्यम प्रमाण ९. कृष्णसखी १०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक १२. नम्र १५. शिल्लक १७. असे असल्यास १८. धूळ २१. फायदा २४. नाजूकपणा नसलेले, भडक २५. प्रौढ, जून २६. थेट, स्पष्ट २८. ताणले जाणारे ३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख ३५. खणणे ३७. माळी, बागवान ४०. अडथळा, प्रश्न ४१. दरारा ४२. नशीब ४३. घोड्यावरून फेरी ४७. काटेरी औषधी वनस्पती ४९. अगदी थोडे ५१. नम्रपणे झुकलेला ५२. उंट हाकणारा ५३. अकस्मात ५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ५६. महासर्प ५९. संधी ६१. नगर ६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा ६४. सततची हालचाल ६६. पटकन ६८. रामदासांचा ग्रंथ ६९. बैलांचा सण, बेंदूर ७०. दरवाज्यावरचा आवाज ७२. दृष्टी ७४. माठ, गाडगे ७५. कारस्थान ७८. मृत्यू

## शब्दकोडे-२८८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ


**उभे उत्तर**

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत

## अहंकार आणि अभिमानाची आवरणं

**- संत राजिन्दर सिंह जी महाराज**

सर्व संत आणि महापुरुष समजावून सांगतात की ईश्वरप्राप्तीच्या मार्गात सर्वात मोठा अडथळा म्हणजे अहंकार. अहंकार उघड आणि दडलेला असू शकतो. हा आपल्याला आपले स्वतःचे वास्तव स्वरूप आणि परमात्मा यांना विसरण्यास प्रवृत्त करतो. अहंकार आणि अभिमान आपल्या आत्म्याभोवती आवरण कसे तयार करतात.



अहंकार दूर करण्यासाठी विवेकबुद्धी आणि मनावर पूर्ण नियंत्रण आवश्यक आहे. आपण संपत्तीचा अभिमान बाळगतो, ज्यामध्ये आपल्याकडे खूप पैसा आणि मौल्यवान वस्तू असल्याचा आपल्याला गर्व होतो. आपण सर्वात श्रीमंत आहोत असे आपल्याला वाटते आणि जे कमी श्रीमंत आहेत त्यांना आपल्यापेक्षा कमी समजतो. अहंकार हा गरीब लोकांची मने दुखावण्यास भाग पाडतो. आपल्याला ज्ञानाचा गर्व होतो. आपल्याला आपल्या पदवीचा गर्व होतो. आपल्याला वाटते की इतर सह-कर्मचाऱ्यांनपेक्षा आपणाला जास्त माहिती आहे, आपण स्वतःला ज्ञानी समजतो, ज्यामुळे आपल्यामधील नम्रतेचा अभाव होतो. जेव्हा आपल्याला वाटते की आपण इतरांपेक्षा अधिक हुशार आहोत, तेव्हा आपण त्या लोकांना दुखावतो. साधेपणाने जगणाऱ्या आणि साधी विचारसरणी असणाऱ्या लोकांना आपल्या इतके कळत नाही असे आपल्याला वाटते. सौंदर्य देखील आपल्यात दुराभिमान निर्माण करते. आपण स्वतःला सर्वात सुंदर समजतो. आपण आपल्या सौंदर्याची एवढी फुशारकी मारतो की कमी सुंदर लोक स्वतःला कमी दर्जाचे समजू लागतात. अशा प्रकारे अहंकार आपल्याला एक प्रकारच्या दिखाऊपणा आणि दांभिकतेकडे घेऊन जातो. आपल्या रंगरूपाद्वारे आपण स्वतःला तसे दाखवण्याचा प्रयत्न करतो, प्रत्यक्षात आपण तसे नसतो. या मुळे इतरांची मने दुखावतात. परंतु आपण हे विसरतो की अशा मुळे सर्वात जास्त नुकसान आपले होते. जेव्हा आपले लक्ष आपल्या बाह्य स्वरूपावर, म्हणजे आपले शरीर, व्यक्तिमत्व, मन आणि संपत्तीवर असते तेव्हा आपण आपल्या आत्म्यावर लक्ष केंद्रित करू शकत नाही. आपला आत्मा हा परिपूर्ण सौंदर्य, ज्ञान आणि संपत्तीचा स्तोत्र आहे, परंतु जो पर्यंत आपण शरीर आणि मनाचे चिंतन करतो तो पर्यंत आपण या खजिन्यांपासून अनभिज्ञ राहतो. या जगातील हे सर्व बाह्य खजिने एक दिवस आपल्याला सोडून जातील आणि आपणाला हे जग रिकाम्या हाताने सोडावे लागेल. **क्रमशः**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय -** फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय -** शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय -** बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### ट्रक चालकांनी कामावर तत्काळ रुजू व्हा; शर्मा

**नाशिक ।** ट्रक चालकांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारने दखल घेतली असून चालकांनी तत्काळ कामावर रुजू होत जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले आहे. केंद्र सरकारने भारतीय न्याय संहिता कलम १०६ (२) अन्वये १० वर्षे तुरुंगवास आणि दंडबाबतच्या तरतुदीबाबत ट्रकचालकांच्या चिंतेची दखल घेतली आहे. याबाबत ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली आहे. नवे कायदे आणि तरतुदी अद्याप अंमलात आलेल्या नाहीत हे सरकारच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. भारतीय न्याय संहिता कलम १०६ (२) लागू करण्याचा निर्णय ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसशी सल्लामसलत केल्यानंतरच घेतला जाईल. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील सर्व ट्रक चालकांनी कामावर रुजू व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी केले आहे

# पॅरालिंपिक स्पोर्ट्स राज्य स्पर्धेत नॅब महाराष्ट्राला ६ सुवर्ण, ५ सिल्वर तर २ कास्य पदके प्राप्त

**नाशिक । प्रतिनिधी**



पॅरालिंपिक स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्रच्या वतीने तिसरी राज्यस्तरीय पॅरालिंपिक चॅम्पियनशिप २०२३-२४ ची स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे २ व ३ जानेवारी रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लॉईड युनिट महाराष्ट्र, नाशिक या संस्थेतील ७ दृष्टीबाधित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना स्पर्धेत राज्यातून संस्थेला ६ सुवर्ण पदके, ५ सिल्वर पदके व २ कास्य पदके मिळवून देवून दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत समाविष्ट होण्याचा मान मिळविला आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या वतीने विजयी खेळाडूंचा सत्कार करून सन्मानित करण्याच्या कार्यक्रमास क्रीडा समितीचे चेअरमन व्ही. एच.पाटील, मानद सचिव गोपी मयूर, उपाध्यक्ष सूर्यभान साळुंखे, सहसचिव डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, शाहीन शेख, प्रदीप सराफ हयांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

या सर्व मुला-मुलींना विशेष शिक्षिका पूजा पांडे व पिंकी मांडगे यांनी मेहनत घेवून प्रशिक्षण दिले. तर विशेष प्रशिक्षण व स्पर्धेतील तांत्रिक मार्गदर्शन क्रीडा प्रशिक्षक सागर गवांदे यांनी तयारी करून घेतली होती. ह्या प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी प्रशासकीय संचालक विनोद जाधव यांनी सांभाळली. दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेत विजयी खेळाडूंना प्रत्येकी ५००० रूपये पारितोषिक दिले जाईल असे क्रीडा चेअरमन व्हि.एच. पाटील यांनी घोषित केले.

खेळाचा प्रकार आणि पदकप्राप्त गुणवंतांची नावे पुढीलप्रमाणे अनुक्रमे आहेत. वरदान जगदीश अष्टिकर गोळा फेक, १०० मीटर धावणे, थाळी फेक-३ सुवर्णपदके. युवराज भरत कासवे - २०० मीटर धावणे, थाळी फेक -१ सुवर्णपदक, १ सिल्वर पदक. प्रणव दीपक महाजन -१०० मीटर धावणे -१ सिल्वर पदक, जगदीश शांताराम कुंभार - ४०० मीटर धावणे, थाळी फेक, लांब उडी - २ सिल्वर पदक, १ कास्यपदक, आरती हरिचंद्र पवार-१०० मीटर धावणे-१ सुवर्णपदक, अभिनव निलेश गांगुर्डे--गोळा फेक, १०० मीटर धावणे -१ सिल्वर,१ कास्यपदक, रोहिणी विष्णू गांगुर्डे -गोळा फेक-१ सुवर्णपदक असे आहेत.

# तृणधान्य वर्षानिमित्त आज भव्य मोटार सायकल रॅलीचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

कृषि विभागामार्फत २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव व आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त आज १० जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता संभाजी चौक, रामेती येथून नाशिक शहरात भव्य मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक मोहन वाघ व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी विवेक सोनवणे यांनी शासकीय प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

राज्यात सन २०२३-२४ या वर्षातील युवा महोत्सवाचे आयोजन नाशिक येथे १२ ते १६ जानेवारी या कालावधीत होणार आहे. या युवा महोत्सव व आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त मिलेट प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीचे उद्घाटन विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असे ही कळविण्यात आले आहे.

पौष्टिक तृणधान्याचे मानवी आहारातील महत्व व वापर वाढविण्यासाठी या मोटार सायकल रॅली व रोड शो चे आयोजन करण्यात आले असून कृषि विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच कृषि संलग्न विभागाचे अधिकारी सहभागी होणार आहेत. त्याअनुषंगाने नागरिकांनी या उपक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि तंदुरुस्तीसाठी पौष्टिक तृणधान्याचा आहारात जास्तीत जास्त समावेश करावा, असे आवाहन ही श्री. वाघ व सोनवणे यांनी केले आहे.

# सुभाषचंद्र बोस गुरुकुलचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात

**लासलगाव । वार्ताहर**

वाहेगाव साळ ता चांदवड येथील श्री.नेताजी सुभाषचंद्र बोस गुरुकुल मध्ये वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न झाले या प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे व संगीत वाद्यांचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ नरेंद्र दराडे,लासलगाव मर्चंट बँकेचे संचालक अशोकराव गवळी,लासलगाव बाजार समितीच्या संचालिका सुवर्णा जगताप,पारस ब्रम्हेचा,अमिता ब्रम्हेचा,किशोर पाटील,केंद्र प्रमुख कौतिक वाकचौरे उपस्थित होते.या प्रसंगी लासलगाव मर्चंट बँकेवर नवनियुक्त झालेल्या सदस्यांचा व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रताप पवार व सचिव डॉ वैशाली पवार यांनी केला.

या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्यातील असलेल्या विशिष्ट कलागुणांना वाव देत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.या वेळी रवींद्र शिंदे यांच्या सह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मोकाटे,प्रवीण देवरे,श्रीमती शिंदे यांनी केले.शाळेचा वार्षिक अहवाल वाचन आणि आभार प्रदर्शन मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पोळ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेतील ३२ आरोग्य कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील ३२ कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या कै.रावसाहेब थोरात सभागृहात समुपदेशनाने पदोन्नती प्रक्रिया पार पडली. यामध्ये आरोग्य सेवक पदावरून आरोग्य सहाय्यक (पुरुष), आरोग्य सेविका पदावरून आरोग्य सहाय्यक (महिला) व आरोग्य सहाय्यक पदावरून आरोग्य पर्यवेक्षक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली. जिल्हा परिषद अंतर्गत वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांच्या पदोन्नती प्रक्रिया ही पूर्ण करण्यात आल्या आहेत. इतर सर्व विभागांनी सुद्धा आपल्या विभागातील पदोन्नती प्रक्रिया ही तात्काळ पूर्ण करावी अशा सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिल्या.

मागील महिन्यात आरोग्य कर्मचारी पदोन्नती संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली. यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) रवींद्र परदेशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी योगेश पाटील, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रदीप चौधरी पदोन्नती प्रस्तावांची पडताळणी केली व दि.९ रोजी आरोग्य सहाय्यक पदावरून आरोग्य पर्यवेक्षक पदावर ३, आरोग्य सेवक मधून आरोग्य सहाय्यक २३ तर आरोग्य सेविका पदावरून आरोग्य सहाय्यक (महिला) ६ अशा एकूण ३२ कर्मचाऱ्यांना समुपदेशनातुन पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली. पदस्थापना देण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते पदोन्नतीचे आदेश देण्यात आले. समुपदेशानातुन पदोन्नती प्रक्रिया पार पडल्यामुळे पदोन्नती मिळालेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले.

# नाशिकच्या स्वानंद बेदरकर यांची पाँडेचेरी येथे व्याख्याने

**नाशिक । प्रतिनिधी**

पाँडेचेरी येथील महायोगी अरविंद केंद्रातर्फे अमृतवक्ता स्वानंद बेदरकर यांची सलग पंधरा दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. त्यासाठी ते नुकतेच पाँडेचेरी येथे रवाना झालेत.

दि.१० जानेवारी ते २३ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या व्याख्यानमालेत बेदरकर भारतीय संस्कृती, भारतीय संत साहित्याची फलश्रुती, महायोगी अरविंद या आणि अशा विविध तात्विक विषयांवर अभ्यासपूर्ण विवेचन करणार असून त्यासाठी त्यांच्यासमोर योगी अरविंद यांचा महाराष्ट्रातील साधक वर्ग श्रोता म्हणून असणार आहे.



भारतीय भाषांमधील विविध अभ्यासकांना पाँडेचेरी येथे अशा अभ्यास वर्गातील महनीय वक्ते म्हणून आमंत्रित केले जाते. त्यात यंदा बेदरकर यांना बोलण्याचा योग आला आहे. यापूर्वी प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्राचार्य राम शेवाळकर, विवेक घळसासी, प्रकाश पाठक यासारख्या अनेक वक्त्यांनी येथे व्याख्यान दिले असून यंदा बेदरकर वैविध्यपूर्ण व्यापक विषयावर मांडणी करणार आहेत.





# नंदकुमार देशपांडे यांच्या सांगितिक कार्याचा गौरव

### के.के.वाघ संस्थेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**नाशिक । प्रतिनीधी**

येथील ज्येष्ठ गायक, संगीतकार नंदकुमार देशपांडे यांच्या सरगम म्युझिक अकादमीला नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली. शेकडो विद्यार्थ्यांना गायन, वादनाचे मार्गदर्शन करून त्यांनी नावारूपाला आणले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन के.के. वाघ शिक्षणसंस्थेतर्फे आदर्श संगीत शिक्षक पुरस्काराने देशपांडे यांचा गौरव करण्यात आला.

के.के.वाघ शैक्षणिक संस्थेच्या प्रांगणात झालेल्या शानदार सोहळ्यात संस्था प्रमुख शकुंतला वाघ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन नंदकुमार देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देशपांडे यांनी रौप्यमहोत्सवी वर्षात मिळालेला हा मानाचा पुरस्कार आपले गुरुवर्य, असंख्य विद्यार्थी व रसिकांना कृतज्ञतापूर्वक समर्पित केला. ते म्हणाले, मराठवाड्यातून नाशिकला आल्यावर हिच माझी कर्मभूमी झाली. नाशिकने मला आपलेसे केले. भरभरून प्रेम, यश व समाधान दिले. यावेळी व्यासपीठावर के.के.वाघ शैक्षणिक संस्थेचे संचालक प्रा.डॉ. के.एन. नांदुरकर, नाशिक जिल्हा कोचिंग क्लासेस संघटनेचे अध्यक्ष जयवंत कुलकर्णी यांच्यासह अनेक पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाला सरगम म्युझिक अकादमीचे विद्यार्थी, हितचिंतकही उपस्थित होते.

# महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील ‘सत्यशोधक’ चित्रपटाला करसवलत देण्याबाबत सकारात्मक : उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात स्त्रीशिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणारे, बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुले करणारे, सत्यशोधक विचारांचे महामानव क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत ‘सत्यशोधक’ चित्रपटाला करसवलत देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिल्या.

चित्रपटांवर आकारण्यात येणाऱ्या १८ टक्के जीएसटीपैकी प्रत्येकी ९ टक्के रक्कम केंद्र आणि राज्य शासनाला मिळत असते. राज्याच्या वाट्याला येणाऱ्या रकमेची करसवलत देण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात येणार आहे. सत्यशोधक चित्रपटाला करसवलत देण्यात यावी अशी मागणी राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी केली होती. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने बैठक आयोजित करत मंत्रिमंडळात प्रस्ताव मांडण्याच्या सूचना दिल्या...

महात्मा फुले आणि सावित्रीबाईंचे कार्य अलौकिक असून ते भावी पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी हा चित्रपट सहाय्यभूत ठरणार असल्याने चित्रपटाला करसवलत दिली पाहिजे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, वित्त, महसूल व सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

अ‍ॅड. दिनेश मधुकर कोळी, साक्री
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो। क.स्तर यांचे कोर्टात**

दि.कि.अ.न. ३५२/२०२३

श्री. बन्सीलाल शेणपडु बागुल ... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ... सामनेवाला.

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट (VIII) बॉम्बे १८२७ अन्वये वारस दाखला ( हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालयात क.स्तर कोर्टात दाखल केला आहे कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की शेंनपडु रमण भिल यांचे दि.२७/०३/१९७६ रोजी तामसवाडी, ता. साक्री, जि. धुळे येथे निधन झाले आहे. मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते

श्री. बन्सीलाल शेणपडु बागुल- उ. व. ७०- मुलगा

मयताला वरीलप्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस विविध प्रकारच्या सरकारी (शासकीय), निमसरकारी (निमशासकीय) महसुली कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसव्यतिरीक्त वारस हक्का असल्यास सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांच्या न्यायालयात दि.०३/०२/२०२४ रोजी स्वत अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसीध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.०५/०१/२०२४

शिक्का

कामगिरी कारकुन — दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री
सहा.अधिक्षक — दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री

अ‍ॅड. दिनेश मधुकर कोळी, साक्री
निशाणी क्र.-६

## जाहीर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो। क.स्तर यांचे कोर्टात**

दि.कि.अ.न. ३७४/२०२३

सौ. रूपाबाई सुकलाल शिंदे वगैरे ... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ... सामनेवाला.

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट (VIII) बॉम्बे १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालयात क स्तर कोर्टात दाखल केला आहे कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की कै. सुरेशभाई काळुबाई सिंधी उर्फ सुरेश सुकलाल शिंदे यांचे दि. ०२/१०/२०२३ रोजी सयाजीराव जनरल हॉस्पीटल वडोदरा, ता. जि. वडोदरा येथे उपचारा दरम्यान अविवाहीत असतांना निधन झाले आहे. मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते.

सौ. रूपाबाई सुकलाल शिंदे - आई

मयताला वरीलप्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस विविध प्रकारच्या सरकारी (शासकीय), निमसरकारी (निमशासकीय) महसुली कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसव्यतिरीक्त वारस हक्का असल्यास सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांच्या न्यायालयात दि.०२/०२/२०२४ रोजी स्वत अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसीध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.०५/०१/२०२४

शिक्का

कामगिरी कारकुन — दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री
सहा.अधिक्षक — दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री

# महाराष्ट्राच्या आगामी निवडणुकांवर ‘आप’मध्ये चर्चा

### केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री मान यांनी साधला सवांद

**नाशिक । प्रतिनिधी**

आम आदमी पार्टी(आप) च्या राज्य पदाधिकाऱ्यांची राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्याशी महाराष्ट्राच्या आगामी निवडणुकांवर नुकतीच चर्चा करण्यात आली.

बडोदा गुजरात येथे आपचे आमदार चैतर वसावा यांच्या मतदार संघात राष्ट्रीय संयोजक तथा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी जनसभा घेवून वसावा यांची लोकसभेसाठी आप तर्फे पहिली उमेदवारी जाहीर केली.



या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील आम आदमी पार्टीच्या राज्य समिती सदस्यांनी महाराष्ट्रातील लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर चर्चा करण्यासाठी केजरीवाल यांची भेट घेतली. तसेच दिल्ली आणि पंजाबमध्ये जनतेला ज्या सुविधा दिल्या जातात त्या अजेंडावर सुद्धा चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातील राजकारण बघता लोकांसमोर फक्त आम आदमी पार्टीचा पर्याय असल्याचे चर्चेतून निष्पन्न झाले. त्यामुळे यापुढील महाराष्ट्रातील निवडणुका आम आदमी पार्टी लढणार हे निश्चित झाले आहे. लवकरच पार्टीच्या प्रसारासाठी अरविंद केजरीवाल आणि भगवंत मान हे महाराष्ट्रात येतील यावर केजरीवाल यांनी शिक्कामोर्तब केले आहे. या बैठकीत महाराष्ट्रात आम आदमी पक्षाचे संघटन आणि विस्तार करण्यावरही चर्चा करण्यात आली.

अरविंद केजरीवाल यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करताना सांगितले की प्रत्येक घराघरात जा आणि प्रत्येक व्यक्तीला आम आदमी पार्टीशी जोडा. कार्यकर्त्यांना एक मजबूत संघटना तयार करण्याच्या सूचनाही केजरीवाल यांनी दिल्याचे कळते आहे. यावेळी महाराष्ट्राचे सहप्रभारी गोपाल इटालिया, उपाध्यक्ष धनंजय शिंदे, संघटन मंत्री अजित फाटके, राज्य मिडिया प्रमुख चंदन पवार संदीप देसाई, डॉ. रियाज पठान, नाविंदर अहलुवालिया, मनिष मोडक, सचिव प्राजक्ता देशमुख आदी उपस्थित होते.

**न्यूज कॉलम**

### विषारी औषध सेवन ; धुळ्यात मुलीचा मृत्यू

**धुळे ।** उंदीर मारण्याचे विषारी औषध सेवन केलेल्या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. श्रुती प्रवीण सोनार असे मृत मुलीचे नाव आहे. तिने ४ जानेवारीला दुपारी दोनच्या सुमारास घरात कोणी नसताना उंदीर मारण्याचे विषारी औषध सेवन केले. ही बाब लक्षात आल्यावर तिला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान रविवारी (ता. ७) मध्यरात्री श्रुतीचा मृत्यू झाला.

### निष्काळजीपणे वाहन चालविल्याने दोघांना पकडले

**सिन्नर ।** निष्काळजीपणे वाहन चालविणे दोघांना चांगलेच भोवले. ८० फुटी रोड भागात दोघा वाहनचालकांना पोलिसांनी पकडले आणि चांगलीच समज दिली. बेदरकारपणे, निष्काळजीपणे वाहन चालविण्याच्या घटना सध्या मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. अशा वाहनधारकांवर कारवाईचे सत्र पोलिसांनी सुरु केलेले आहे. शहरातील शंभरफुटी रोडवर दोघांवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे अन्य वाहनधारकांना मोठी चपराक बसली आहे.

# नरडाणा शिक्षण प्रसारक मंडळाचे कलारंग-२०२४ महोत्सवामध्ये सुप्त कलागुणांची उधळण

## बाल कलाकारांच्या अभिनयाने प्रेक्षक मंत्रमुग्ध ना.अनिल पाटील

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शिंदखेडा तालुक्यातील नरडाणा शिक्षण प्रसारक मंडळ,नरडाणा संचलित,विकास विद्यालय व कला,विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,नरडाणा व विकास उर्दू माध्यमिक विद्यालय,नरडाणा तसेच कै. डी.बी.सिसोदे इंग्लिश मेडियम स्कूल,नरडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कलारंग-२०२४ या सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन,आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना.अनिल भाईदास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्येची दैवता शारदास्तवनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. गणेश वंदनेने कार्यक्रमात रंग भरला आमच्या पप्पांनी गणपती आणला या सुपर हिट गाण्यावर नृत्य केलेल्या बालकलाकारांनी साऱ्याचीच मने जिंकली शिवतांडवा, शंकरारे, शंकराने शिवभक्ती जागृत केली. सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्षस्थानी नरडाणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष उदयराव सिसोदे हे होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नरडाणा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवप्रिया सिसोदे, प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच मनिषा सिसोदे, माजी उपसरपंच उपेंद्र सिसोदे, नरडाणा गटातील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जितेंद्र सिसोदे, नरडाणा शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक चंद्रजित सिसोदे, कल्पना सिसोदे, प्रेरणा सिसोदे, उपसरपंच जागृती सिसोदे, नेहा सिसोदे, नरडाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे, मृणाल जंगळे, जिजाबराव सिसोदे, संजय सोनवणे, वैशाली महाले, लिलाधर सोनवणे, डाबली ग्रामपंचायत उपसरपंच प्रविण सोनवणे, गिरीश आखाडे, अजय भामरे, भाऊसाहेब बोरसे तसेच नरडाणा परिसरातील आजी-माजी सरपंच व विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन उपस्थित होते. तसेच कलारंग-२०२४ चे प्रमुख - नरडाणा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सत्यजित उदय सिसोदे यांनी सुयोग आयोजन केले. रंगीबेरंगी पोशाखात नटलेली बालके धम्माल गीतांच्या तालावर थिरकणारी त्यांची पावले अन् भरगच्च प्रेक्षकांची मिळणारी भरभरून दाद यामुळे एकाहून एक असे बहारदार कार्यक्रम रंगमंचावर सादर करून उपस्थित पालक वर्गाची मने या बाल कलाकारांनी जिंकली. या वेळी सुमारे २९ कार्यक्रम सादरीकरण करून साऱ्यांची दाद मिळवली. तसेच कलारंग-२०२४ कार्यक्रमाचे नरडाणा विकास विद्यालयाचे कला विभागाचे प्रमुख आर.व्ही.भामरे, कलाशिक्षक राहुल एच.पाटील यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी विकास विद्यालय व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप व्ही. शिसोदे, उपमुख्याध्यापक अविनाश बी. कोतकर, पर्यवेक्षक आर.के. सिसोदे, विकास उर्दू माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रभाकर जे. पाटील, कै. डी.बी. सिसोदे इंग्लिश मेडियम स्कूलचे मुख्याध्यापिका जयश्री ए. पवार व सर्व शिक्षक व शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल काळे,संजीव जगताप,प्रा. प्रविण बाविस्कर यांनी केले.



## श्री संताजी जगनाडे महाराजांना पक्ष, संघटनांतर्फे धुळ्यात अभिवादन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

तेली समाजाचे आराध्य दैवत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज शहरात विविध कार्यक्रम होत आहेत. आज सकाळी शहरातील गुरुशिष्य स्मारक येथे विविध पक्ष, संघटनांतर्फे पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. शिवाय विविध ठिकाणी देखील अभिवादनाचे कार्यक्रम झाला.

शहरातील पदाधिकार्यांकडून गुरुशिष्य स्मारकास अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रथम महापौर भगवान करनकाळ, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल, युवराज करनकाळ, कमलाकर अहिरराव, जयश्री अहिरराव, रमेश श्रीखंडे, रामेश्वर चौधरी, युवराज चौधरी, रघुनाथ चौधरी, आनंदा चौधरी, अनिल अहिरराव, पोपटराव चौधरी, कैलास चौधरी, अंकुश चौधरी, सजन तुषार चौधरी, अतिश चौधरी, नंदू अहिरराव, भैय्या चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस इर्शाद जहागीरदार, जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी, महिला जिल्हाध्यक्ष जया साळुंके, वंदना केदार, फर्जना शहा, रंजना निकुंभे, शुभांगी मुंडके, सरला मोहने, कोमल मगर, संजय अहिरे, महेंद्र शिरसाठ, नरेंद्र अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा परिषद खरेदी करणार ६ नवीन इलेक्ट्रिक वाहने

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियान अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात जिल्हा व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला असून या कक्षाचे उद्घाटन धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता उपस्थित होते.

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक पालक विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांचे शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान दिनांक एक जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र स्तर,तालुकास्तर मूल्यांकन समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. जिल्हास्तर मूल्यांकन समितीचे अध्यक्ष म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शुभम गुप्ता आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) श्री. भाऊसाहेब अकलाडे, डायटचे प्राचार्य डॉ.मंजुषा क्षीरसागर, उपशिक्षणाधिकारी श्री सिद्धार्थ नगराळे व शिक्षण विभागाचे सर्व शिक्षण विस्तार अधिकारी,सहायक प्रशासन अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

# शहरात नव्या व्हेरिएंटचा प्रसार! १८ बाधित; वैद्यकीय यंत्रणा अलर्टवर

### करोनाचे रुग्ण आढळल्याने उडाली खळबळ

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मागील आठ दिवसांत शहरात कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटने अठरा जणांना बाधित केले आहे. त्यामुळे वैद्यकीय यंत्रणा अलर्ट मोडमध्ये आली असून, रुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेऊन अॅन्टिजेन तपासण्या केल्या जात आहेत.

नाशिक जिल्ह्यात सिन्नर, त्र्यंबकेश्र्वर मध्ये कोरोनाचे रुग्ण आढळल्याने खळबळ उडाली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टास्क फोर्स स्थापन करण्यात आल्यानंतर दोनच दिवसांत कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे स्पष्ट झाले. यापूर्वी कोरोनाचे तीन रुग्ण होते. महात्मानगरमधील ३२ वर्षीय महिलेला सर्दी, खोकल्याचा त्रास जाणवू लागल्यानंतर शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. या महिलेची आरटीपीसीआर चाचणी पॉझिटिव्ह आढळून आली. उर्वरित रुग्णांवर घरीच उपचार सुरू होते. कोरोनाची लक्षणे आढळलेल्यांपैकी एक हजार ५०६ जणांच्या अॅन्टिजेन, तर १०३ जणांच्या आरटीपीसीआर एकूण एक हजार ६०९ जणांच्या चाचण्या करण्यात आल्या. यात १८ कोरोना पॉझिटिव्ह आढळले. रुग्णांना गृहविलगीकरणात ठेवण्यात आले. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचे महापालिकेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण यांनी सांगितले.

# शिरपूर तालुक्यात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमाला प्रारंभ

**वरुळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान राज्य शासनाच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाच्यावतीने १ जानेवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी नियोजनाच्या अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी गणेश सुरवडकर यांनी तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांची नुकतीच आढावा सभा घेतली. अभियानात सर्व शाळांनी सहभाग नोंदवून स्पर्धेमध्ये पुरस्कार प्राप्त करावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी गणेश सुरवडकर यांनी केले.

या अभियानात शिरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २८२ तर १४२ खासगी शाळांचा समावेश आहे. या अभियानात स्थानिक स्वराज्य संस्था व इतर व्यवस्थापनाच्या शाळा, अशा दोन वर्गवारीतून शाळेची निवड होणार आहे. या दोन्ही वर्गवारीतून स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार तीन लाख रुपये, द्वितीय पुरस्कार दोन लाख रुपये, तृतीय पुरस्कार एक लाख रुपये राहणार आहे. जिल्हास्तरावर प्रथम पुरस्कार ११ लाख रुपये, द्वितीय पुरस्कार पाच लाख रुपये व तृतीय पुरस्कार तीन लाख रुपये राहणार आहे. विभागीय स्तरावर प्रथम पुरस्कार २१ लाख रुपये, द्वितीय पुरस्कार ११ लाख, रुपये तृतीय पुरस्कार सात लाख रुपये राहणार आहे. राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार ५१ लाख रुपये, द्वितीय पुरस्कार २१ लाख रुपये व तृतीय पुरस्कार ११ लाख रुपये राहणार आहे. या अभियानात सहभागी होणाऱ्या शिरपूर तालुक्यातुन ४२२ शाळांनी त्याअनुषंगाने तयारी सुरू केली असल्याचे दिसून आले.

आपल्या शाळेत ज्या ज्या सुविधा आहेत त्यांची माहिती व फोटो अपलोड करायचे आहे. ज्या सुविधा नसतील त्या त्या सुविधांचा ४५ दिवसांत निर्माण करुन ती माहिती छायाचित्रांसह अपलोड करावी लागणार आहे. तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापकांच्या विचार सभा घेतल्या आहेत.

> **केंद्रीय स्तरावर प्रमुख असलेल्या केंद्रप्रमुखांना मुख्याध्यापकांची केंद्रीय बैठक घेऊन उपलब्ध सुविधांची माहिती अपलोड करून घेत, उर्वरित सुविधांचा ४५ दिवसात पाठपुरावा करून उपक्रमात सहभागी करून घेणे आहे. १०० टक्के सर्व शाळांनी सहभाग घ्यावा.**
> **गणेश सुरवडकर, गटशिक्षणाधिकारी शिरपूर**

### सेट परीक्षा अर्ज भरण्यास सुरवात

**नाशिक ।** इंदु राज्य पात्रता परीक्षा (सेट) २०२४ परीक्षेच्या तारखेची घोषणा यापूर्वी करण्यात आलेली होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे अर्ज प्रक्रियेचा सविस्तर तपशील जारी करण्यात आला आहे. त्यानुसार शुक्रवार (ता.१२) पासून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरवात होणार आहे. ३९ व्या एम-सेट परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. ७ एप्रिलला ही परीक्षा महाराष्ट्रासह गोव्यात घेतली जाणार आहे.

# शिवसेनेतर्फे महिलांना शिलाई मशीन व शेतकऱ्यांना जलपरी वाटप

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शिवसेना संपर्कप्रमुख अशोक धात्रक व सह संपर्कप्रमुख हिलाल माळी यांच्या हस्ते पन्नास टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशीन व शेतकऱ्यांना जलपरी वाटप धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील महिलांना शिलाई मशीन व शेतकऱ्यांना जलपरी वाटप करण्यात आले.

शिवसेनेच्या वतीने शिवसेना तालुका संघटक तुषार भामरे व मातोश्री ग्रुप मेहरगाव यांच्या वतीने ५० टक्के अनुदानावर ७१ शिलाई मशीन १७ जलपरी मोटर वाटप करण्यात आले.बाळासाहेब ठाकरे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, शिवसेना नेते संजयजी राऊत, रवींद्र मिर्लेकर, धुळे जिल्ह्याचे संपर्कप्रमुख अशोक धात्रक, हिलाल माळी यांच्या मार्गदर्शनाने धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघात तालुका संघटक तुषार भामरे यांच्या प्रयत्नाने शिलाई मशीन वाटप करण्यात आले. यामध्ये आमदड ८, सुकवड ८, निमडाळे ५, मेहेरगाव २१, नवलाने ७, चौगाव ८, नगाव २, कापडणे ४, खंडलाय ५, बांबुर्ले १, कुंडाणे १, लामकानी १, जलपरी मोटर १७ वाटप करण्यात आले. तालुका संघटक तुषार भामरे व मातोश्री ग्रुप यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी हिलाल अण्णा माळी म्हणाले की शिवसेनेच्या माध्यमातून तुषार भामरे असे उपक्रम राबवत असतो. व तालुक्यात चांगली काम करतो. असे देखील सांगितले. यावेळी तालुकाप्रमुख बाबाजी पाटील, संघटक देवराम माळी, उपतालुकाप्रमुख गीतेश पाटील, विभाग प्रमुख हेमराज पाटील, उपमहानगर प्रमुख भटू गवळी, एकनाथ सूर्यवंशी, अविनाश शेलार, मनोहर पाटील, निकुंबे भामरे, दगा पाटील, निमडाळे ग्रामपंचायत सदस्य अंबर माळी, प्रदीप सूर्यवंशी, योगेश बागुल, महेंद्र भामरे, संजीव भामरे, रमेश भामरे, भूषण भामरे, विनोद भामरे, असलम पिंजारी, योगेश भामरे, जगदीश चिंचोले, रामकृष्ण भामरे, बारकू भामरे आदी ग्रामस्थ व शिवसैनिक महिला भगिनी उपस्थित होते.

# सहा अधिकाऱ्यांवर २ वर्षांनी गुन्हा

**धुळे ।** राजनगाव (ता. साक्री) शिवारात विजेचा शॉक लागून सातवर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. एका कंपनीच्या निष्काळजीपणामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. त्यानुसार दोन वर्षांनी कंपनीच्या सहा अधिकाऱ्यांवर निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. संदीप संजय सूर्यवंशी (रा. राजनगाव) असे त्या विद्यार्थ्याचे नाव आहे.

विशाल पिंपळे (रा. छडवेल कोर्डे, ता. साक्री) यांच्या फिर्यादीनुसार १८ नोव्हेंबर २०२० ला राजनगाव येथे वीजनिर्मितीच्या टॉवर क्रमांक २९५ जवळील ट्रान्स्फॉर्मरचे गेट उघडे होते. तेथे सुरक्षारक्षक नसल्याने विद्यार्थी शेतात खेळत होते. गेट उघडे असल्याने ते आत शिरले. उपचारादरम्यान १९ नोव्हेंबर २०२० ला संदीपचा मृत्यू झाला. या प्रकरणी संबंधित कंपनीचे सुनील नंदलाल चावला (रा. मुंबई). सुमीत मारोतराव बहादेकर (रा. छडवेल कोर्डे, ता. साक्री), शरमसिंग (रा. मगरपट्टा, हडपसर, पुणे), तुकाराम सुकदेव जावरे (रा. वाघोदा रोड, नंदुरबार), नितीनकुमार ग्यानदेव लांडे (रा. अवधूत पार्क, नंदुरबार) व ज्ञानेश्र्वर पंडित पवार (रा. आमखेल, ता. साक्री) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.



# 'सायबर सुरक्षा व जनजागृती अभियान' संपन्न

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयात धुळे पोलीस दल आणि सायबर अवेअरनेस फौंडेशन आयोजित 'सायबर सुरक्षा व जनजागृती अभियान' संपन्न झाले. सरस्वती पूजन, द्विपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

भारतासारख्या देशात तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्हे अतिशय वेगाने वाढत आहे. तेव्हा संरक्षण करता यावे या हेतूने हे चर्चासत्र आयोजित केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील (सायबर पोलीस स्टेशन, धुळे), ॲड. चैतन्य भंडारी (सायबर अवेअरनेस फौंडेशन प्रमुख), प्रितेश चौधरी (धुळे सायबर पथक), महिला पोलीस दामिनी पथक प्रमुख श्रीमती छाया पाटील, प्राचार्य डॉ. एस.जे.सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, उपप्राचार्य डॉ.ए.ए.शिरखेडकर, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.आमोद पाटील, समन्वयिका प्रा.स्नेहल भावसार, डॉ. उज्ज्वलदिप देवरे, प्रा.कमलेश माळी, प्रा.विवेक कुमावत, प्रा.राहुल सरोदे, प्रा.सुरज चौधरी, प्रा.सोपान कुंभार, प्रा.प्रीति बोबडे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ.ए.ए. शिरखेडकर यांनी कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये सांगताना आजकाल सोशल मिडिया वापर वाढला आहे; तसेच अतिजलद गतीने पैसे आणि प्रसिद्धी मिळवणे यामुळे बरेच सायबर गुन्हे घडत आहेत. तरी याबद्दल विदयार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने हा कार्यक्रम आयोजित केल्याचे स्पष्ट केले.

# कार्यकर्त्यांच्या बळावर आगामी निवडणुकांचे युध्द आपल्याला जिंकायचे आहे: अजित पवार

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो आणि या कार्यकर्त्यांच्या बळावर आगामी निवडणुकांचे युध्द आपल्याला जिंकायचे आहे असा जबरदस्त विश्र्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी षण्मुखानंद सभागृहात झालेल्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात व्यक्त केला.

मुंबईमध्ये पक्ष ज्या पध्दतीने वाढायला हवा होता. तसा वाढला नाही, आमचं लक्ष फक्त ग्रामीण भागाकडे राहिले. आता समीर भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत जे काम सुरू आहे त्यातून आपल्याला नक्कीच बळ मिळेल असा मला विश्र्वास अजितदादा पवार यांनी मुंबईत व्यक्त केला.

यावेळी ते म्हणाले की, आता आपल्याला वेळ कमी आहे. सुरुवात चांगली झाली आहे. त्यामध्ये सातत्य ठेवा. काम करताना खटका उडत असतो मात्र तो समजून घेऊन काम करा. आठवडयातील एक दिवस राष्ट्रवादीचे मंत्री आणि आमदार मुंबईसाठी वेळ देतील. आपल्यातही ती जिद्द आहे आपणही तसे काम सुरू करु. सकाळी मुंबईतील वेगवेगळ्या भागात जाऊन लोकहिताच्या कामांची पाहणी आपण करू शकतो. याबरोबरच मुंबापुरीला एक रुपयाचा निधी कमी पडू देणार नाही असा शब्दही अजितदादा पवार यांनी दिला. या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. प्रफुल्ल पटेल म्हणाले की, तुमच्यासोबत आम्ही आहोतच. मात्र मुंबई शहरावर लक्ष केंद्रित केले तर परिस्थिती आपल्या बाजूने येऊ शकते या षण्मुखानंद सभागृहाचे आणि पक्षाचे एक वेगळे नाते आहे. इथल्या बैठकीत अजितदादा पवार यांनी एल्गार पुकारला होता. त्यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद अजितदादा पवार यांना राज्यातून मिळाला होता. राज्यातील प्रत्येक कार्यकर्ता, पदाधिकारी अजितदादा पवार यांच्या पाठीशी आहे हे सिध्द झाले आहे. यावेळी सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, मुंबई राष्ट्रवादीचे अध्यक्ष समीर भुजबळ यांनी बैठकीमध्ये मार्गदर्शन केले. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, महिला कार्याध्यक्षा आरती साळवी, मनिषा तुपे, कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, शिवाजीराव नलावडे यांनी आपले विचार मांडले. मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसचा भव्य संवाद मेळावा पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव,माजी आमदार पंकज भुजबळ, कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, शिवाजीराव नलावडे, महिला कार्याध्यक्षा आरती साळवी, मनिषा तुपे, युवक अध्यक्ष सुनिल गिरी आदींसह पक्षाचे सहा जिल्हाध्यक्ष, सर्व तालुकाध्यक्ष आणि कार्यकर्ते व पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
बुधवार दि. १० जानेवारी २०२४






# मुंबईचे स्पेशल आयजी अब्दूर रहेमान यांची पत्रकार भवनास सदिच्छा भेट

## पदाधिकारींचा सत्कार करून लायब्ररीची केली प्रशंसा


























धुळे। समाजातील सर्व घटकांना संधी व न्याय मिळेल अशी लोकशाही राज्यव्यवस्था निर्माण करण्यात लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारितेचा महत्वपूर्ण वाटा असतो. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी आपली जबाबदारी पार पाडताना समाजाच्या संरचनेतील घटकांना स्थान देऊन त्यांचे एकूणच जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समजतील सर्वच स्तरातील जनता रिफ्लेकट करण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला तर खरी लोकशाही रुजेल असे स्पष्ट मत मुंबईचे स्पेशल आयजी तथा धुळे जिल्ह्याचे कर्तव्यकठोर माजी पोलीस अधीक्षक अब्दूर रहेमान यांनी धुळ्यात व्यक्त केले. अब्दूर रहेमान धुळ्यात आले असता त्यांनी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनास सदिच्छा भेट दिली. एनआरसी कायद्याच्या विरोधात राजीनामा का दिला असे विचारले असता अब्दूर रहेमान म्हणाले की, एनआरसी कायदा हा ज्यांच्याकडे स्वतः ची जमीन नाही त्यांना नागरिकत्व नाकारतो, जर नागरिकत्व मान्य केले तर त्यांना निवडणूक लढण्यास प्रतिबंध करतो. देशातील दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, ओबीसी, अल्पसंख्यांक अशा प्रवर्गातील स्वतःची मालकीची जमीन नसलेल्या नागरिकांची संख्या ही खूप मोठी आहे. अशा नागरिकांना नागरिकत्वाच्या अधिकारापासून एनआरसी कायदा वंचित ठेवतो. यामुळे चुकीचा कायदा राबविणाऱ्या यंत्रणेचा भाग मी असू नये म्हणून प्रशासनाकडे राजीनामा सादर केला आहे. तो इन प्रोसेसमध्ये असल्याचेही अब्दूर रहेमान म्हणाले. यावेळी त्यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्त्या नाजनीन शेख उपस्थित होत्या. अब्दूर रहेमान यांनी पत्रकार संघाच्या सभागृहातील ग्रंथसंपदा पाहून त्याविषयी माहिती जाणून घेत लायब्ररीच्या नीटनेटकेपणाची प्रशंसा करीत पत्रकार संघाची कामगिरी सतत उंचावत राहो अशा शुभेच्छाही दिल्या. यावेळी अब्दूर रहेमान यांनी स्वलिखित व प्रकाशित 'पॉलिटिकल एक्सलुजन ऑफ इंडियन मुस्लिम' हे पुस्तक व बुके भेट देऊन पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, कार्यकारिणी सदस्य जमील शाह, आकाश सोनवणे, दीपक शिंदे, पत्रकार पुरुषोत्तम गरुड यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

बुधवार दि. १० जानेवारी २०२४





# शंभराव्या नाट्य संमेलन सोहळ्याची दमदार सांगता

## नाटके, एकांकिका पाहण्यासाठी तरुणाईची गर्दी



















पिंपरी । शंभराव्या

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या दुस-या दिवशीही पिंपरी -चिंचवड शहरातील विविध नाट्यगृहात भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांवरील नाटकांनी प्रेक्षकांच्या मनाला भुरळ पाडल्याचे बघायला मिळाले. ग. दि. माडगूळकर मुख्य सभागृहात वर्ध्याच्या 'अध्ययन भारती' या संस्थेने 'तेरवं' हे प्रायोगिक नाटक सादर केले. याचे लेखन श्याम पेठकर यांनी केले आहे तर हरिश इथापे यांनी हे संवदेनशील नाटक दिग्दर्शित केले आहे. या नाटकांत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या बायकांची गोष्ट आहे. तसेच सादर करणाऱ्या सर्व महिलाच आहेत. त्यातही पाच जणी या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नी आहेत, दोघी जणी आत्महत्याग्रस्त कुटुंबातल्या मुली आहेत, तर सहा जणी या नाट्यसंस्थेतल्या आहेत. तेरा जणींनी मिळून प्रेक्षकांना अंतर्मुख करणारे हे नाटक सादर केले. 'घाशीराम कोतवाल या मराठीतील मैलाचा दगड असलेल्या प्रसिद्ध नाटकाचा प्रयोग नाट्यसंमेलनात सादर करण्यात आला. विजय तेंडूलकर लिखित या नाटकाचे दिग्दर्शक नाट्यसमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांनी केले होते. देशासह विदेशातही डॉ. पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या या नाटकाने आपला अमिट ठसा उमटवलेला आहे. आज डॉ. पटेल अध्यक्ष झाल्याने पांडव निर्मित या नाटकाचा खास प्रयोग नाट्यसमेलनात ठेवण्यात आला होता. त्याला प्रेक्षकांनीही उदंड प्रतिसाद दिला.